मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# कर्मचारी आले अन महिन्यात गेले!

## महापालिकेत नव्याने रुजू झालेल्या 12 कर्मचाऱ्यांनी दिले महिनाभरात राजीनामे : मोक्याची नोकरी सोडल्याने आश्चर्य

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेत नव्याने रुजू १२ कर्मचाऱ्यांनी अवध्या महिनाभरात महापालिकेच्या हक्काच्या नोकरीचा राजीनामा दिला आहे. इतर ठिकाणी चांगला पर्याय उपलब्ध झाल्याने या कर्मचाऱ्यांनी राजीनामे दिल्याचे सांगण्यात येत असले तरी महापालिकेची नोकरी सोडल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.



महापालिकेने विविध ११ पदांच्या ३६२ जागांसाठी नोकर भरती राबविली होती. त्यापैकी आतापर्यंत एकूण २५६ कर्मचारी रुजू झाले आहेत. त्यांना प्रशिक्षण देऊन विविध विभागांत नेमणुका देण्यात आल्या आहेत. मात्र, त्यापैकी १२ कर्मचाऱ्यांनी अवघ्या एक ते दोन महिन्यातच आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे राजीनामा सादर केला आहे. नव्यानेच लागलेली महापालिकेची कायमस्वरूपी हक्काची नोकरी सोडत असल्याने अधिकाऱ्यांच्या भुवया उंचावल्या आहेत.

पिपरी-चिंचवड महापालिका राज्यात 'श्रीमंत महापालिका' म्हणून ओळखली जाते. शहराची स्मार्ट सिटीच्या दिशेने वाटचाल सुरू आहे. विविध नावीन्यपूर्ण व नवनवीन संकल्पना महापालिकेकडून राबविल्या जात आहेत, मोठेमोठे खर्चिक प्रकल्प महापालिकेकडून राबविले जातात. त्यामुळे राज्यभरातील अधिकारी महापालिकेने संधी मिळावी म्हणून प्रयत्नशील असतात.

नियुक्ती मिळावी म्हणून थेट मॅटपर्यंत काही प्रकरणे पोहोचली आहेत. असे चित्र असताना नव्याने रुजू झालेले कर्मचाऱ्यांचे महापालिकेत मन रमत नसल्याचे दिसत आहे. आतापर्यंत तब्बल १२ जणांनी आपल्या पदाचा आयुक्तांकडे राजीनामा दिला आहे. तो आयुक्तांनी मंजूर करीत त्यांना कार्यमुक्त केले आहे. त्या रिक्त जागेवर प्रतीक्षा यादीतील उमेदवारांना संधी देण्यात येणार आहे. ही प्रक्रिया लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता संपल्यानंतर म्हणजे ६ जून २०२४ नंतर केली जाणार आहे, असे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

> राज्यात विविध विभागांच्या एकाच वेळी परीक्षा झाल्याने उमेदवारांना अनेक पर्याय उपलब्ध झाले आहेत. उमेदवारांनी वेगवेगळ्या विभागांतील पदासाठी परीक्षा दिल्या आहेत. निकाल लागल्यानंतर ते महापालिकेत रुजू झाले. त्यानंतर इतर विभागांचा निकाल लागला. त्यातही निवड झाल्याने आणि अधिक वेतन, इतर सुविधा असल्याने रुजू झालेल्या काही कर्मचाऱ्यांनी राजीनामा दिला आहे. आतापर्यंत आयुक्तांनी नव्या १२ कर्मचाऱ्यांचे राजीनामे मंजूर केले आहेत.
> - विठ्ठल जोशी, उपयुक्त, सामान्य प्रशासन, महापालिका.

# झाडांच्या तक्रारीचा '24 तासांत' निपटारा!

## महापालिका प्रशासन नवे पोर्टल विकसित करणार : आमदार महेश लांडगे यांच्या बैठकीत आयुक्तांचे निर्देश

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील अति धोकादायक झाडांबाबतच्या तक्रारींचा आता '२४ तासांत' निपटारा होणार आहे. त्यासाठी प्रशासन 'सारथी' हेल्पलाईनच्या धर्तीवर नवीन ऑनलाईन पोर्टल विकसित करणार आहे. यासाठी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी उद्यान विभागाला तात्काळ कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत.

भोसरी विधानसभा मतदार संघातील पावसाळा पूर्व कामांचा आढावा घेण्यासाठी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी ऑटो क्लस्टर येथे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांची भेट घेतली. यावेळी नालेसफाई, नागरी आरोग्य, आपत्ती व्यवस्थापन आदी विविध मुद्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

पावसाळा सुरू होत असल्यामुळे महापालिका प्रशासन आपत्ती व्यवस्थान विभाग व नियोजन सक्षम करावे. पहिल्याच पावसात भोसरीतील शांतीनगर, आदिनाथनगर आदी भागात पाणी साचले जाते. पावसाचे पाणी वाहून जाणाऱ्या वाहिन्या अनेक ठिकाणी 'ड्रेनेजलाईन'ला जोडल्या आहेत. त्यामुळे काही ठिकाणी ' ड्रेनेज चोकअप' होतात. त्यामुळे 'ड्रेनेज क्लिनिंग व्हेईकल'ची संख्या वाढवावी, अशी सूचना आमदार महेश लांडगे यांनी केली.



**..असे असेल पोर्टल**

» झाडांबाबतच्या तक्रारीसाठी ऑनलाईन पोर्टल तयार केले जाणार आहे. त्यामध्ये नागरिकांना धोकादायक झाडाची तक्रार रजिस्टर करता येईल. तसेच, त्याचा फोटो, लोकेशन आणि अपेक्षीत कारवाईबाबत नोंदणी करता येणार आहे. सदर तक्रार सोडवून संबंधित तक्रारदाराला अपडेट मिळेल, अशा स्वरुपाचे पोर्टल विकसित करण्याबाबत प्रशासन कार्यवाही करणार आहे.

शहरातील प्रत्येक प्रभागामध्ये 'ड्रेनेज क्लिनिंग व्हेईकल' आहे. तरीही, अपत्तीकाळातील खबरदारी म्हणून महापालिका मुख्यालय येथे आणखी एक ड्रेनेज क्लिनिंग व्हेईकल तैनात करण्याची सूचना आयुक्त शेखर सिंह यांनी पर्यावरण विभागाचे कार्यकारी अभियंता संजय कुलकर्णी यांना केली आहे.

> भोसरी विधानसभा मतदार संघासाठी सुरू केलेल्या 'परिवर्तन हेल्पलाईन'साठी नियमितपणे सुमारे १५० तक्रारी प्राप्त होत आहेत. पावसाळ्यात या तक्रारींमध्ये आणखी वाढ होणार आहे. त्यामुळे नालेसफाई, ड्रेनेज लाईन, स्ट्रॉमवॉटर लाईन, नागरी आरोग्य, रस्त्यांवरी खड्डे, आपत्ती व्यवस्थापन अशा मुद्यांवर महापालिका प्रशासनाला सूचना केली आहे. त्यावर सकारात्मक कार्यवाहीचा विश्वास आयुक्त शेखर सिंह यांनी दिला आहे. भोसरी मतदार संघातील नागरिकांनी नागरी समस्या सोडवण्यासाठी परिवर्तन हेल्पलाईन - 9379909090 या क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन करतो.
> - महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# एका दिंडीतील केवळ 90 वारकऱ्यांनाच प्रवेश

## श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी प्रस्थानदिनी मंदिरातील गर्दी नियंत्रित करणार

**पुणे | प्रतिनिधी**

श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी प्रस्थान सोहळ्यादिनी देऊळवाड्यात गर्दी होऊ नये, यासाठी दिंड्यांमधील वारकऱ्यांना मर्यादित प्रवेश दिला जाणार आहे. ‘श्री’च्या रथापुढील २०, मागील २७ आणि ९ उप दिंड्या अशा एकूण ५६ दिंड्यांतील प्रत्येकी ९० वारकऱ्यांना मंदिरात प्रवेश दिला जाणार आहे. वारकऱ्यांना मंदिर प्रवेश पास प्रस्थानाच्या दोन दिवस आधी चोपदार आणि संस्थानकडून देण्यात येणार आहेत.



माउलींच्या पालखीचे २९ जून रोजी पंढरपूरकडे प्रस्थान होणार आहे. प्रस्थान सोहळ्याच्या नियोजनाबाबत देवस्थानच्या भक्तनिवासात झालेल्या बैठकीत हा निर्णय झाला. प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश महेंद्र महाजन, पालखी सोहळाप्रमुख योगी निरंजननाथ, डॉ. भावार्थ देखणे, पालखी सोहळा मालक बाळासाहेब आरफळकर, देवस्थानचे व्यवस्थापक माउली वीर, पोलीस उपायुक्त डॉ. शिवाजी पवार, प्रांताधिकारी जोगेंद्र कट्यारे, सहायक पोलीस आयुक्त राजेंद्र गौड, राजाभाऊ चोपदार, बाळासाहेब चोपदार, राणू महाराज वासकर, भाऊसाहेब गोसावी, भाऊ महाराज फुरसुंगीकर, मारुती कोकाटे यांच्यासह दिंडी चालक-मालक या वेळी उपस्थित होते.

मंदिराच्या क्षेत्रफळाचा विचार करून आवश्यक गर्दी कमी करण्याबाबत चर्चा झाली. वारकरी संप्रदायातील मान्यवरांनी प्रस्थानदिनी १२५, १०० किंवा ९५ वारकरी संख्या निश्चित करण्याची मागणी केली. चेंगराचेंगरी टाळण्यासाठी मानाच्या ४७ दिंड्या आणि नऊ उपदिंड्या अशा ५६ दिंड्यांतील प्रत्येकी ९० वारकऱ्यांना प्रवेश देण्यास मान्यता देण्यात आली. प्रशासन आणि मानाच्या दिंडीकऱ्यांकडून यास एकमुखाने मान्यता देण्यात आली.

दरम्यान गेल्या वर्षी मंदिरात प्रवेशादरम्यान महाद्वारात, वारकरी शिक्षण संस्थेच्या बोळासमोरून महाद्वाराकडे येताना वारकऱ्यांच्या गर्दीने चेंगराचेंगरी झाली होती. वारकरी विद्यार्थी आणि पोलीस यांमध्ये हुज्जत झाली होती. त्या वेळी लाठीमारासारखी घटना घडली. असा अनुचित प्रकार यापुढे घडू नये यासाठी दक्षता घेण्यासह उपाययोजनासंदर्भात चर्चा झाली.

> “ देऊळवाड्यात जागा कमी आहे. त्यामुळे मानाच्या प्रत्येक दिंडीतील ९० वारकऱ्यांना मंदिरात प्रवेश देण्याचा निर्णय घेतला आहे. अनावश्यक गर्दी कमी करण्यासाठी प्रशासकीय अधिकारी, माध्यम प्रतिनिधींच्या संख्येवर नियंत्रण घालण्यात येणार आहे.
>
> **- माउली वीर (व्यवस्थापक, आळंदी देवस्थान)**

> “ पालखी सोहळा सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने वारीचे मार्गक्रमण, परंपरा जाणून घेण्याची भूमिका पोलिसांची असते. चेंगराचेंगरी टाळण्यासाठी वारकऱ्यांची संख्या मर्यादित असावी.
>
> **- डॉ. शिवाजी पवार, पोलीस उपायुक्त**

# मंत्रिपदाचा उपयोग पुण्याला व्हावा, कंत्राटदारांना नाही

## नवनिर्वाचित खासदार सुप्रिया सुळे यांचा मुरलीधर मोहोळांना सणसणीत टोला

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्याला मंत्रिपद मिळालं, त्याचा उपयोग पुण्याला व्हावा, कंत्राटदारांना नाही, असं म्हणत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी नवनिर्वाचित केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांना सणसणीत टोला लगावला आहे. तसेच, सुनील तटकरे यांना मंत्रीपद मिळाल नाही? यावर प्रतिक्रिया देताना मैं दुसरो के घर में क्यु झांक्यू, असं सुप्रिया सुळे म्हणाल्या आहेत. त्याचप्रमाणे गेल्या काही दिवसांपासून युगेंद्र पवार आमदार होणार असल्याच्या चर्चांना उधाण आल्याचं पाहायला मिळालं. त्यावरही सुप्रिया सुळेंनी भाष्य केलं आहे. त्याबाबत मला माहीत नाही, मी दिल्लीत होते, कदाचित चर्चा असू शकते, असं सुप्रिया सुळे म्हणाल्या आहेत.





राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे बोलताना म्हणाल्या की, काल दिल्लीत वर्कींग कमिटीची बैठक झाली. पुढची 25 वर्षाचा रोडमॅपवर चर्चा झाली. राज्यात आणि देशात संघटनेची ताकत कशी वाढेल यावर चर्चा झाली. कार्यकर्ते आणि जनतेनं आम्हाला साथ दिली, त्यासाठी त्यांचे आभार. कार्यकर्ता खचला नाही, लढत राहिला, त्याचा अभिमान आहे.

संघटनेचे नवं धोरणं सांगू. मी घराबाहेर पडले की, तुम्ही असता, घरी जाताना देखील तुम्ही असता, तुम्ही घरी जात की नाही. 50 खोक इज नॉट ओके, असं कार्यकर्त्यांनी जनतेनं दाखवून दिलंय, धनशक्तीला जनतेनं नाकारलं आहे. ऑक्टोबरमध्ये धंगेकर पुन्हा आमदार होतील. देशाला दाखवून दिलं की अन्याय होऊ देणार नाही पुणे पॉर्शे केसमध्ये चांगलं काम केलं, असं सुप्रिया सुळे म्हणाल्या आहेत.

पुण्यात प्रशासनच नाही, त्यामुळे पुण्याची अशी परिस्थिती आहे. शिक्षणाचं माहेर घर म्हणून देशातील लोक विद्यार्थी येतात. मात्र, अशा घटनांनी पुण्याचं नाव खराब होत आहे. पुण्याची सगळी परिस्थिती सरकारमुळे झाली आहे. गुन्हेगारीच्या विरोधात राष्ट्रवादीनं रस्त्यावर उतरलं पाहिजे. निकाल लागल्यापासून मी शांत झाले आहे. कारण आता जबाबदारी वाढली. पुण्यातल्या इन्व्हस्टमेंट बाहेर जाणार नाही. यासाठी मराठा चेंबर्ससोबत बैठक घेणार, नोकऱ्या बाहेर जाणार नाही याची काळजी घेणार आहे, असं सुप्रिया सुळे म्हणाल्या. तसेच, राष्ट्रवादी पक्ष अजित पवारांना पूर्णपणे मिळाला नाही, असंही सुप्रिया सुळेंनी सांगितलं आहे.

दोन राष्ट्रवादी एकत्र येणार का? तसे बॅनर लागलेत? यावर प्रतिक्रिया देताना सुप्रिया सुळे म्हणाल्या की, बॅनरनं देश चालत नाही. दुष्काळ, खासदार गुन्हेगारी आणि विधानसभेवर लक्ष देणार आहे. सरसकट कर्जमाफी व्हायला हवी, एवढीच अपेक्षा आहे. त्याचप्रमाणे, जम्मू काश्मीरमध्ये घटना घडली ही अत्यंत दुःखद, सगळ्यांना श्रद्धांजली देते, असं सुप्रिया सुळे म्हणाल्या आहेत. एकीकडे मोदी शपथ घेत होते आणि दुसरीकडे अटॅक सुरू होता, हे पहिल्यांदा घडलं, असं सुप्रिया सुळे म्हणाल्या.

# पिंपरी-चिंचवडमध्ये महायुतीला पहिला धक्का

## भाजपाच्या माजी नगरसेविका प्रियांका बारसे यांचा राष्ट्रवादी शरद पवार गटात प्रवेश!

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरीतील भाजपाच्या नगरसेविका प्रियांका प्रविण बारसे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत आज यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात अधिकृत प्रवेश केला. लोकसभा निवडणुकीनंतर पिंपरी-चिंचवडमध्ये महायुतीला हा पहिला धक्का मानला जात आहे. विशेष म्हणजे, आगामी विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीकडून बारसे निवडणुकीच्या रिंगणात उतरतील? अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

खासदार सुप्रिया सुळे, माजी मंत्री आमदर जितेंद्र आव्हाड, युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख, युवक शहराध्यक्ष इम्रान शेख कार्याध्यक्ष सागर तापकीर यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश घेण्यात आला. यावेळी रजनीकांत गायकवाड, शाहिद शेख,अशरफ शेख,फहिम शेख, मेघराज लोखंडे, समाधान अचलखांब, प्रवीण बारसे तसेच सुहास देशमुख, प्रथमेश बारसे, कान्होपात्रा थोरात, वैशाली पडवळ आधी युवक आणि महिला पदाधिकारी उपस्थित होते.



> भाजपाच्या स्थानिक नेतृत्त्वाच्या हुकूमशाही कार्यपद्धतीला कंटाळून तसेच आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या विचाराला प्रेरित होऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करत आहे. भाजपमधील अजून सहकारी आमच्या सोबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात येण्यास तयार आहेत. येणाऱ्या काळात प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील साहेब खासदार डॉ अमोल कोल्हे साहेब यांच्या नेतृत्वात तसेच युवकअध्यक्ष इम्रान शेख आणि सहकारी यांच्या सोबतीने पिंपरी चिंचवड शहरात जोमाने काम करणार आहे.
> - प्रियांका बारसे, माजी नगरसेविका.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने महाराष्ट्रात बाजी मारली.या निवडणुकीत शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसने दहा पैकी आठ खासदार निवडून आणत महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनता शरदचंद्र पवार यांच्या पाठीशी असल्याचे दाखवून दिले. तसेच शिरूर लोकसभेत डॉ अमोल कोल्हे यांना मिळालेल्या जनसामान्याचे कौल लक्षात घेत पिंपरी चिंचवड शहरातील लोकप्रतिनिधी यांचा कल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षाच्या दिशेने जाण्याचे संकेत आता मिळू लागले आहे.भोसरीतील शिक्षण संस्थेच्या माध्यमातून सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या उच्चशिक्षित भाजप नगरसेविका प्रियांका बारसे यांच्या राष्ट्रवादीतील प्रवेशामुळे पिंपरी चिंचवड शहरात तुतारी जोरात वाजणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### बारसे तो झाँकी है, पाच और बाकी है... : इम्रान शेख

» "आज मुंबई येथे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील साहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून आणि भाजपच्या भ्रष्टाचाराला कंटाळून भाजपच्या नगरसेविका प्रियांका बारसे यांनी आमच्या पक्षात प्रवेश केला. आदरणीय शरदचंद्र पवार साहेब यांच्या शिव फुले शाहू आंबेडकर विचारधारेला प्रभावीत होऊन प्रियांका बारसे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अधिकृत प्रवेश केला असून लोकसभा निकालाच्या आधी पासून त्या जयंत पाटील साहेब यांच्या संपर्कात होत्या. येत्या काही दिवसात इतर पक्षातील पाच नगरसेवक प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील साहेब यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करतील, असा दावा युवक शहराध्यक्ष इम्रान शेख यांनी केला आहे.

# काही दशकांत मावळात वरुणराजाच्या दूतांचे दर्शन दुर्मीळ

## पावसाच्या आगमनाअगोदर पर्यावरणात अनेक बदल पशु-पक्षी निसर्गाच्या समतोलात महत्त्वाचे

**पिंपरी | प्रतिनिधी**

निसर्ग आणि पावसाचे अतूट नाते आहे. त्याचप्रमाणे पाऊस आणि पक्षी, किटकांचे नातेही घट्ट आहे. पावसाच्या आगमनाचे संकेत हे किटक, पक्षी देत असतात. परंतु, गेल्या काही दशकांत या नात्याला दृष्ट लागल्याचे दिसून येत आहे. वरुणराजाचे हे दूत दुर्मीळ होऊ लागले असून निसर्गप्रेमी, पर्यावरणाचे अभ्यासक त्याबाबत चिंता व्यक्त करत आहेत.

पावसाच्या आगमनाअगोदर पर्यावरणात अनेक बदल घडत असतात. निसर्गाच्या समतोलात महत्त्वाची भूमिका बजावणारे पशु-पक्षी आणि किटक यांच्याकडून त्याची स्वतःच्या खास शैलीत नोंद घेतली जाते. त्यामध्ये प्रामुख्याने चातक, पावशा पक्षी, मृग कीडा, वाळवी, तितर, वादळी पक्षी, कावळे यांचा समावेश आहे. परंतु, पर्यावरणाचा असमतोल आणि पावसाच्या लहरीपणाचा त्यांच्यावरही विपरीत परिणाम होऊ लागला आहे.



> बरेच पक्षी आणि किटक पावसाचा आणि दुष्काळाचा अचूक अंदाज सांगत असतात. त्यामागे गेल्या शेकडो वर्षांचा अभ्यास आणि अभ्यासकांचे निरीक्षण आहे. जे आजच्या आधुनिक युगातही खरे होत आहे हे विशेष. परंतु, अलीकडे निसर्गाचा समतोल ढळत असून हे पक्षी व किटक दुर्मिळ होत चालले आहेत, ही चिंतेची बाब झाली आहे.
> - महेश महाजन, निसर्ग तज्ञ, फ्रेंड्स ऑफ नेचर

आफ्रिकेतून येणारे चातक पक्षी पावसाचा अंदाज अगदी अचूक देत असतात. पाऊस वेळेवर येणार असेल; तर या पक्ष्यांचे आगमन लवकर होते. त्यांना यायला उशीर झाला तर पावसाचे आगमनही लांबते. त्याचप्रमाणे पाठीवर लाल रंग असणारा मृग किडा जर जास्त संख्येने दिसायला लागला; तर पाऊस येण्याचा हा शुभ संकेत असतो. त्याच्यासारखे आणखी बरेच किटक पावसाचा अंदाज अचूक देत असतात.

शेत, माळरानात अंगावर काळ्या-पांढऱ्या रंगाचे ठिपके असलेल्या तितर (ग्रामीण भागात चित्तर) म्हणून ओळखला जाणाऱ्या पक्ष्यांचे थवे एका वेगळ्या सांकेतिक स्वरात ओरडू लागले, की पाऊस येतोय असे समजले जाते. याशिवाय, पावसाळ्यापूर्वी वारुळातून वाळवीचे थवेच्या थवे हजारोंच्या संख्येने बाहेर पडू लागले की, पावसाचे लवकर आगमन होते. पावसाळ्यापूर्वीचा काळ त्यांच्या प्रजननासाठी सर्वोत्तम मानला जातो.

### काळ्या मुंग्या, कावळ्याचे घरटेही देते निरोप !

» काळ्या मुंग्या त्यांची पांढरी अंडी तोंडात धरून सुरक्षित जागी नेऊ लागल्यास पाऊस नक्की पडणार, हे समजावे. पुरातन काळापासून काळ्या मुंग्यांच्या हालचालींवरून पावसाचे अंदाज बांधले जात आहेत. याशिवाय, कावळ्याने पूर्वेला घरटे बांधले; तर पाऊस चांगला पडतो. पश्चिमेला केल्यास सरासरी पाऊस तर दक्षिण आणि उत्तरेला असेल तर कमी पाऊस पडण्याचे संकेत मिळतात. तसेच जर घरटे झाडाच्या शेंड्यावर बांधले तर अत्यंत कमी पाऊस पडेल, असा अंदाज गेल्या शेकडो वर्षांपासून वर्तविला जात आहे.

# जिजामाता पॅनल ताकदीने लढणार

## पॅनलचे सर्वेसर्वा काळे यांची घोषणा : शरद पवार गटाने तयारी दाखविल्यास तयारी

**पुणे | प्रतिनिधी**

इंदापूर तालुक्यामध्ये अग्रगण्य मानला जाणाऱ्या श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या येणाऱ्या निवडणुकीमध्ये जिजामाता पॅनल पूर्णपणे ताकदीनिशी लढणार आहे. हा पॅनल आम आदमी एकत्र येऊन तयार होणार आहे. आतापर्यंत कारखान्यावर असलेल्या घराणेशाहीच्या पगडा असलेल्यांच्या विरोधात लढणार आहे. घोषणा जिजामाता पॅनलचे सर्वेसर्वा सुनील काळे यांनी केली.

कारखान्याच्या हितासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्ष यांनी आम्हाला सोबत घेऊन श्री छत्रपती कारखान्याची संचालक मंडळाचे निवडणूक लढविण्याची तयारी दाखवली तर नक्कीच आम्ही सर्वजण राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्ष यांच्याबरोबर श्री छत्रपती कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी तयार असल्याचे त्यांनी यावेळी जाहीर केले. बारामती येथे पत्रकार परिषदेत ते बोलत होते.



### राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्ष यांच्याबरोबर निवडणुकीसाठी तयार

» सुनील काळे म्हणाले की, श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या येऊ घातलेल्या संचालक मंडळाच्या निवडणुकीमध्ये जिजामाता पॅनल हा आम आदमीला घेऊन लढणार आहे. मात्र, श्री छत्रपती कारखान्याच्या हितासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्ष यांनी आम्हाला सोबत घेऊन श्री छत्रपती कारखान्याची संचालक मंडळाचे निवडणूक लढविण्याची तयारी दाखवली तर नक्कीच आम्ही सर्वजण राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्ष यांच्याबरोबर श्री छत्रपती कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी तयार असल्याचे यावेळी त्यांनी जाहीर केले.

सुनील काळे म्हणाले की, बारामती तालुक्यातील सोमेश्वर सहकारी साखर कारखाना विद्यमान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी 1991 साली ताब्यात घेतला. त्या वेळेपासून आजपर्यंत हा साखर कारखाना प्रगतीपथावर असून सध्या हा कारखाना या भागामध्ये एक नंबरचा साखर कारखाना असल्याचे गणले जात आहे. श्री छत्रपती सहकारी साखर कारखाना हा 1992 साली उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या ताब्यात आला. त्यावेळेपासून आतापर्यंत गेल्या 32 वर्षांमध्ये कारखान्याची प्रगती न होता हा सहकारी तत्त्वावर चालणारा साखर कारखाना आजपर्यंत कायमस्वरूपी आर्थिक अडचणींचा सामना करीत आहे. दोन्ही कारखान्यांवर सत्ता अजित पवार यांचीच असून देखील हा फरक नक्की कशामुळे होत आहे, याचा विचार जनतेने केला पाहिजे.

ते म्हणाले की, 1992 साली सुनील काळे यांच्या नेतृत्वाखाली जिजामाता पॅनल हा तयार करण्यात आला. त्यावेळी 1997 च्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सुनील काळे यांच्यावर श्री छत्रपती कारखान्याच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये गोंधळ घातल्याने त्यांचे व त्यांच्या दोन भावांचे सभासदत्व रद्द करण्यासाठी त्याच सभेमध्ये तातडीने ठराव मांडून तो ठराव मंजूर करण्यात आला. परंतु याबाबत सर्व माहिती घेऊन सर्वसाधारण सभेमध्ये घडलेल्या घटनेबाबत कोणतीही बाब प्रलंबित नसल्याने 15 मे 2024 रोजीच्या ॲड. प्रतिमा विजय पवार यांनी काढलेल्या नोटीसमध्ये सुनील काळे व त्यांचे दोन्ही भाऊ श्री छत्रपती कारखान्याचे ऊस उत्पादक सभासद होते. आजही आहेत. याबाबतचे पत्र श्री छत्रपती साखर कारखान्यास व तत्कालीन अध्यक्षांना दिल्याची माहिती काळे यांनी दिली.

### सर्व बाबींचा विचार करून लढणार

» काळे म्हणाले की, श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या येऊ घातलेल्या निवडणुकीमध्ये सर्व बाबींचा विचार करून जिजामाता पॅनल हा पूर्ण ताकदीनिशी उभा राहील. सर्वसामान्य जनतेच्या ताकदीवर हा पॅनल उभा राहणार असून खऱ्या अर्थाने आम आदमीचा हा पॅनल असणार आहे.

# शिरूर तालुक्यातील शेतकरी सुखावला सरासरी 59.5 टक्के पाऊस

## टँकर सुरु असलेल्या गावांना दिलासा तीन दिवसांत दमदार हजेरी : न्हावरा गावात सर्वाधिक टक्का

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर शहरासह तालुक्याच्या ग्रामीण भागात शनिवारी (दि.८) रात्री ११ च्या दरम्यान मेघगर्जनेसह पावसाने दमदार हजेरी लावली. यामुळे शेतक-यांमधून समाधान व्यक्त होत आहे. तसेच पावसामुळे टँकर सुरू असलेल्या कान्हूर मेसाई, पाबळ, केंदूर परिसरातील गावांतही पावसाने हजेरी लावल्याने या गावांनाही थोड्याफार प्रमाणात दिलासा मिळाला आहे.

शिरूर शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागातील टाकळी हाजी, सविंदणे, कवठे येमाई, पाबळ, मलठण, पिंपरखेड, न्हावरे, मांडवगण फराटा परिसरातील गावांमध्ये (दि.८) रात्री उशिरा पावसाने दमदार हजेरी लावली. शिरूर शहराप्रमाणे तालुक्याच्या ग्रामीण भागात पावसाने दमदार हजेरी लावली.

या पावसामुळे उकाडा कमी होण्यास मदत झाली असून अशाच दमदार पावसाची शेतकऱ्यांना प्रतीक्षा आहे. जोरदार झालेल्या पावसामुळे अनेक गावातील वीज गायब होती. त्यामुळे नागरिकांना रात्र अंधारात काढावी लागली. यंदा तीव्र उन्हाळा जाणवत होता. त्यातच पाण्याची टंचाई तसेच चाऱ्याचा प्रश्न भीषण बनला होता.

गेली अनेक दिवस बळीराजा पावसाच्या प्रतीक्षेत असताना शिरुर तालुक्यातील अनेक गावांमध्ये पाण्याची समस्या बिकट होत असताना नुकतेच पावसाचे आगमन झाले. पावसाने दमदार हजेरी लावल्याने शेतकरी वर्ग आनंदित होऊन बळीराजा सुखावला आहे. शिरुर तालुक्यात तीन दिवसांत सरासरी ५९.५ टक्के पावसाची नोंद झाली आहे.

शिरुर तालुक्यातील शेतकऱ्यांनी शेतामध्ये अनेक पिके घेतलेली आहेत. पाण्याची टंचाई निर्माण झालेली असताना शेतातील विहिरी व विंधनविहिरींनी तळ गाठला होता. त्यामुळे सर्वच भागातील शेतकरी चिंतेत आले होते. शिरुर तालुक्यात नुकतेच पावसाने हजेरी लावल्याने अनेक ठिकाणी शेतात पाणीच पाणी झाले आहे.



### वडगाव रासाईत सर्वाधिक नोंद

» शिरुर तालुक्यातील गावनिहाय पावसाची सरासरी पुढीलप्रमाणे- शिरुर – ७४.५ टक्के (तीन दिवस) , टाकळी – १५.१ टक्के, वडगाव रासाई- ७७.८ टक्के, न्हावरा- १३६.६ टक्के, मलठण (२ दिवस) – २८.२ टक्के, तळेगाव ढमढेरे (२ दिवस) – ६२.४ टक्के, रांजणगाव गणपती (२ दिवस) – ४६.५ टक्के, कोरेगाव भिमा ( २दिवस ) – ६३.४ टक्के, पाबळ (१ दिवस) – ३०.६ टक्के.

### खरिपासाठी फायदा

» शेतातील पिके पाण्याअभावी जळून चाललेली असताना, शेतीची व जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाली होती. मात्र सध्या चांगला पाऊस झाल्याने पिकांना नवचैतन्य मिळणार असून पुढील पिकांना देखील फायदा होणार आहे. तसेच विहीरी व विंधनविहीरीच्या पाणी पातळीत वाढ होणार असल्याचे निमगाव म्हाळुंगी येथील प्रगतशील शेतकरी हरिभाऊ भोरडे यांनी सांगितले.